महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : recruitment4msedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०१३५०५
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/सेप्र/१३६८५

दिनांक : २२/०८/२०२०

प्रति,
मा. जिल्हा शल्य चिकीत्सक,
सर्व जिल्हा सामान्य रुग्णालये.

**विषय:** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये "उपकेंद्र सहाय्यक" पदावर निवड झालेल्या उमेदवारांचे वैद्यकीय तपासणीबाबत.

--------------

महोदय,

१. महावितरण कंपनीमध्ये "उपकेंद्र सहाय्यक" या पदाकरीता जाहिरात क्र. ०५/२०१९ अन्वये भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर भरती प्रक्रियेचा निकाल दिनांक २८/०६/२०२० व दिनांक २२/०८/२०२० रोजी कंपनीच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. निवड झालेल्या सर्व उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करुन पात्र उमेदवारांना "उपकेंद्र सहाय्यक" या वेतनगट-३ मधील पदावर नियुक्ती आदेश देण्यात येणार आहेत.

२. उमेदवारांची कागदपत्रांची पडताळणी यशस्वीरित्या पार पडल्यानंतर त्यांना त्वरीत नियुक्ती देता यावी याकरीता त्यांच्या वैद्यकीय तपासणी अहवालाची आवश्यकता आहे.

३. आपणास विनंती करण्यात येते की, "उपकेंद्र सहाय्यक" पदावर नियुक्तीकरीता निवड झालेल्या उमेदवारांची तपासणी करावी व त्यांचे आरोग्य, त्याचप्रमाणे म.रा.वि.वि. कंपनीमध्ये "उपकेंद्र सहाय्यक" पदावर सेवेसाठी शारीरिक पात्रता आहे किंवा नाही याबाबत आपला अभिप्राय देण्यात यावा. याकरीता आवश्यक फी (क्ष-किरण अहवालासह) उमेदवाराकडून घेण्यात यावी.

४. मंडळ/कंपनीचे सुधारपत्र क्र. ३४ दिनांक ३०/०६/१९७७ तसेच म.रा.वि.वि.कं.मर्या., वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम-२००५ मधील १४ वी अनुसूची अन्वये उमेदवाराने त्याच्या छातीचा क्ष-किरण अहवाल सादर करणे अत्यंत आवश्यक आहे.

५. तसेच आपणास विनंती करण्यात येते की, उमेदवाराचा वैद्यकीय तपासणी अहवाल संबंधित उमेदवाराकडे बंद लिफाफ्यात हस्तांतरीत करावा.

६. सदर वैद्यकीय तपासणीच्यावेळी ओळखपत्र/परिचयपत्र म्हणून उमेदवाराच्या आधार कार्ड/मतदान ओळखपत्र/पासपोर्ट/वैध वाहन परवाना यापैकी एखादया ओळखपत्राचा विचार व्हावा.

कळावे.

आपला विश्वासू,

(कमांडर शिवाजी इंदलकर, निवृत्त)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

C:\Users\DINESH\Desktop\Govt Letter- 29.06.2020.doc